# प्रेसनोट

नाशिक,
दि. १६ /०५/२०२३

**आलोसे क्र १.सतीश भाऊराव खरे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक आलोसे क्र २. ॲड. शैलेष सुमतीलाल साभद्रा, व्यवसाय - वकील, रा.गंगापुर रोड, नाशिक यांनी ३०,००,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | गंगापुर पोलीस ठाणे, नाशिक शहर गुरनं. १२३/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७,७ अ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) सतीश भाऊराव खरे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक<br>२) ॲड.श्री.शैलेष सुमतीलाल साभद्रा,व्यवसाय- वकील, रा.फ्लॅट नं ४, उर्वी अपार्टमेंट, सौभाग्यनगर, गंगापुर रोड, नाशिक |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३०,००,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३०,००,०००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, दिंडोरी या पदाचे निवडीविरूध्द दाखल याचिकेची सुनावणीचा निकाल तक्रारदार यांचे बाजुने देण्यासाठी आलोसे क्र १ सतीश भाऊराव खरे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी **३०,००,०००/- रूपये** लाचेची मागणी केली तसेच आलोसे क्र २ ॲड.शैलेष सुमतीलाल साभद्रा, वकील,रा.गंगापुर रोड, यांनी आलोसे क्र १ यांचे ओळखीचा तक्रारदार यांचेवर प्रभाव टाकुन आलोसे क्र १ यांचे करीता **३०,००,०००/- रूपये** लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करून सापळा आयोजित केला असता सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र १ सतीश भाऊराव खरे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी ३०,००,०००/- रूपये लाचेची मागणी केली तसेच आलोसे क्र २ ॲड.शैलेष सुमतीलाल साभद्रा, वकील, रा.गंगापुर रोड, यांनी आलोसे क्र १ यांचे ओळखीचा तक्रारदार यांचेवर प्रभाव टाकुन आलोसे क्र १ यांचे करीता ३०,००,०००/- रूपये लाचेची मागणी केली व सदर लाचेची रक्कम आलोसे क्र १ यांनी दि.१५.०५.२०२३ रोजी स्वत:चे फ्लॅटमध्ये स्विकारल्याने त्यांना पकडण्यात आले असुन दोघांविरूध्द गंगापुर पोलीस ठाणे, नाशिक शहर गुरनं. १२३/२०२३, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७,७ अ प्रमाणे दि.१६.५.२०२३ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.


संपर्क पत्ता :- ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक
संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in
ई-मेल :- spacbnashik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :- acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२५३-२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्स ॲपक्र :- ९९३०९९७७००



16/05/23
( नरेंद्र भा. पवार )
पोलीस उपअधीक्षक ( वाचक )
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
नाशिक परिक्षेत्र, नाशिक.


पोलीस उपआयुक्त/पोलीस अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो * नाशिक परिक्षेत्र, नाशिक * सत्यमेव जयते